**<u>ठळक बातम्या</u>**

- परकीय चलन वाचवण्यासाठी विविध उपाय योजण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह विविध मान्यवरांचं देशवासियांना आवाहन

- विकसित भारत जी रामजी कायद्याची अधिसूचना प्रसिद्ध, १ जुलैपासून अंमलबजावणी सुरू होणार

- अमरावतीमध्ये तलावात बुडून चौघांचा मृत्यू

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्सच्या प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याच्या शक्यता संपुष्टात

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातल्या नागरिकांना परकीय चलन वाचवण्यासाठी ७ आवाहनं केली आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून…

***होल्ड कॅप्सूल***

*(सर्वसामान्य नागरिकांनी खाद्य तेलाचा वापर कमी करावा, शेतकऱ्यांनी आयात केलेल्या रासायनिक खतांवरच अवलंबित्व कमी करावं असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.*

***होल्ड प्रधानमंत्री बाइट***

*सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि कारपूलिंगचा वापर करुन इंधनबचत करा आणि त्याद्वारे परकीय चलन वाचवा, असं प्रधानमंत्री काल हैदराबादमध्ये म्हणाले. वर्षभरासाठी परदेश दौरे थांबवा, सोने खरेदी करु नका असं आवाहनही त्यांनी भारतीयांना केलं आहे. वर्क फ्रॉम होम पुन्हा सुरू करण्याची सूचना त्यांनी विविध कंपन्यांना केली. २०४७ पर्यंत विकसित भारत बनवण्यासाठी आत्मनिर्भर होणं आणि सेंद्रीय शेतीवर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.*
*इंधन आणि तेलाचा आवश्यकतेपेक्षा जास्त वापर केला तर भारतालाही संकटाचा सामना करावा लागू शकतो, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले*

***होल्ड मुख्यमंत्री बाइट***

*माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही व्यावसायिकांना तसंच नागरिकांना परकीय चलनाचा वापर कमी करण्य़ाचं आवाहन केलं आहे. परकीय चलनाचा अधिक वापर होत असलेली क्षेत्र पाहून हा वापर कसा कमी करता येईल यादिशेने प्रयत्न करण्याचं आवाहन वैष्णव यांनी केलं.*

*सरकारच्या १२ वर्षातल्या अपयशामुळं अशा प्रकारचं आवाहन करावं लागतं आहे अशी टीका विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. काय विकत घ्यावं काय घेऊ नये यासारख्या जबाबदारी नागरिकांवर टाकून सरकार जबाबदारी ढकलत असल्याचा आरोप त्यांनी केला.*

*देशात सध्या ६९० अब्ज डॉलरच इतक्या मूल्याचं परकीय चलन उपलब्ध असल्याचं रिझर्व्ह बँकेनं शनिवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात स्पष्ट झालं आहे. गेल्या आठवडाभरात त्यात सुमारे पावणे ८ अब्ज डॉलरची घट झाली. गेल्यावर्षीच्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देशातला परकीय चलनाचा साठा ६८६ अब्ज डॉलर इतका होता. पश्चिम आशियातलं युद्ध सुरू होण्यापूर्वी, २७ फेब्रुवारीला, देशातला परकीय चलन साठा ७२८ अब्ज डॉलरच्या विक्रमी पातळीवर पोहोचला होता. तेव्हापासून त्यात ३८ अब्ज डॉलरची घट झाल्याचं दिसतंय. )*

**<><><><>**

जगभरात अनिश्चिततेचं वातावरण असलं तरीही भारतीय अर्थव्यवस्था लवचिक असून चालू आर्थिक वर्षात सहा पूर्णांक सहा दशांश टक्के वाढ नोंदवू शकते, असा अंदाज भारतीय स्टेट बँकेनं आज जारी केलेल्या संशोधन अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत थोडी मंदी दिसून आली असली तरी अर्थव्यवस्थेनं विकासाची मजबूत गती कायम ठेवली आहे, असंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><>**

विकसित भारत जी रामजी अर्थात विकसित भारत रोजगार आणि आजिविका मिशन ग्रामीण कायदा २०२५ लागू करण्यासंदर्भात केंद्र सरकारनं आज अधिसूचना जारी केली. येत्या १ जुलै पासून देशभरात हा कायदा लागू होणार आहे. या कायद्यानुसार ग्रामीण भागात

प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १२५ दिवस रोजगार मिळण्याची खात्री असेल. केंद्रीय मंत्री शिवराज चौहान यासंदर्भात म्हणाले.

- **- होल्ड - शिवराज चौहान बाइट - - -**

- **<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज आय आय टी मुंबई इथं हवेतला कार्बनडाय ऑक्साइड जमा करून साठवण्याच्या प्रायोगिक तत्त्वावरच्या प्रकल्पाचं आणि यासाठीच्या खनन प्रक्रियेचं उद्घाटन केलं. या प्रकल्पात कार्बनडाय ऑक्साइडपासून कॅल्शियम कार्बोनेट तयार करून पोलाद, रंग, सिमेंट आणि घरबांधणी उद्योगांमध्ये चुन्याच्या ऐवजी त्याचा वापर केला जाऊ शकतो, अशी माहिती प्रधान यांनी दिली. कार्बन उत्सर्जनाच्या जागतिक समस्येवर तोडगा काढणाऱ्या आय आय टी मुंबईच्या चमूचं त्यांनी अभिनंदन केलं. येत्या काही दिवसांत हा प्रकल्प व्यावसायिक तत्त्वावर कार्यान्वित केला जाईल आणि पुढच्या महिन्यात फ्रान्समध्ये होणाऱ्या भारत इनोव्हेट्स परिषदेत हा प्रकल्प सादर केला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

**<><><><><>**

अमरावतीत फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या घातखेडा इथल्या तलावात बुडून बहिण भावासह चौघांचा मृत्यू झाला. तलावात उडी मारल्यावर खोलीचा अंदाज न आल्याने त्यातली एक मुलगी बुडू लागली. तिला वाचवण्याच्या प्रयत्नात इतर मुलांनीही पाण्यात उड्या मारल्या असता त्यांचा बुडून मृत्यू झाला.

**<><><><><>**

कितीही आक्रमक आले तरी सनातन संस्कृतीचा कधीही अंत होऊ शकत नाही याचं सोमनाथ मंदिर हे ठळक उदाहरण आहे, असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं आहे. ते आज मुंबईत 'सोमनाथ स्वाभिमान पर्वाच्या निमित्तानं महालक्ष्मी इथल्या श्री धाकलेश्वर महादेव मंदिरात अभिषेक आणि पूजा केल्यानंतर उपस्थितांना संबोधित करत होते. सौराष्ट्रातलं सोमनाथ हे केवळ मंदिर नसून देशाच्या आत्म्याचं प्रतीक आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात अनेक ठिकाणी सलग तीन दिवस पडलेल्या जोरदार अवकाळी पावसामुळे मोठं नुकसान झालं असून, जनजीवन विस्कळीत झालं आहे. त्याविषयी अधिक माहिती आमच्या वार्ताहरांकडून...

**- - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(जिल्ह्याच्या अर्थकारणाचा कणा असलेल्या हापूस आंब्याचं उत्पादन यंदा मुळात १५ ते २० टक्केच अपेक्षित होतं. त्यात आता हंगाम अंतिम टप्प्यात असताना हाताशी येणार असलेले तयार आंबे अक्षरशः धुळीला मिळाल्यामुळे बागायतदारांचं मोठं नुकसान झालं. रातांब्यांसारख्या पिकांचीही वाट लागली. रत्नागिरी, लांजा, राजापूर, संगमेश्वर, खेड, दापोली आणि मंडणगड या तालुक्यांमध्ये महावितरणचे उच्चदाब वाहिनीचे १०८, तर लघुदाब वाहिनीचे २३५ खांब पडले. त्यामुळे आणि झाडंही कोसळल्यामुळे वीजवाहिन्या तुटून अनेक ठिकाणचा वीजपुरवठा खंडित झाला. महावितरणचं सुमारे ८० लाख रुपयांचं नुकसान झालं. कर्मचारी दिवस-रात्र एक करून युद्धपातळीवर काम करत असले, तरी अनेक ठिकाणी २४ तास उलटून गेल्यानंतरही वीजपुरवठा सुरळीत झाला नव्हता. या कालावधीत विवाहसोहळ्यांसह अनेक समारंभ पूर्वनियोजित असल्याने संबंधित सर्वांची मोठी तारांबळ उडाली. महामार्गाचं काम अर्धवट असल्याने अनेक ठिकाणी पाणी साचलं, काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं. वीज पडून किंवा झाडं कोसळून घरं, गोठे, कुक्कुटपालन केंद्रांचं नुकसान झालं. )*

*आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी*

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, सर्व संलग्नित महाविद्यालयं, स्वायत्त महाविद्यालयं आणि मान्यताप्राप्त संस्थेतल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी २६ मे पर्यंत नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. मुंबई विद्यापीठाच्या muadmission.samarth.edu.in या संकेतस्थळावर जाऊन विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करता येतील.

एल.एल.एम.च्या सीईटीसाठी अर्ज करायलाही मुंबई विद्यापीठानं १५ मे पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात होणार आहे. धर्मशाला इथे एचपीसीए मैदानावर संध्याकाळी साडे सातवाजता सामन्याला सुरुवात होईल.

काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मुंबई इंडियन्सवर २ गडी राखून विजय मिळवला. आरसीबीने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला होता. मुंबईच्या संघाने निर्धारित २० षटकांत ७ बाद १६६ धावा केल्या होत्या. बंगळुरू संघानं हे लक्ष्य विसाव्या षटकात २ गडी राखून पूर्ण केलं. या विजयामुळे आरसीबी गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचली असून मुंबईच्या प्लेऑफच्या आशा संपुष्टात आल्या आहेत. सध्या मुंबईचा संघ ११ पैकी आठ सामने गमावून सहा गुणांसह गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे.

//<><><><><>//